ISSN - No. 2319-9318

*Peer Reviewed International Research Journal*

UGC Approved

# VIDYAWARTA

*Special Issue.*

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

## Arts,Commerce and Science College, Ashti

Tal.Ashti, Dist.Beed (MS)

Accredited by NAAC B++ Grade with 2.78 CGPA,
ISO 9001:2015, Green Audited College

Interdisciplinary National Conference on

## Recent Trends in Social Sciences & Commerce



27th February 2018

## HISTORY AND SOCIOLOGY

Organizer
Dr. S. R. Nimbore
Principal

Scanned with CamScanner

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

**Arts, Commerce & Science College, Ashti, Dist.Beed**

Accredited by NAAC B'' Grade with 2.78 CGPA, ISO 9001:2015, Green Audited College

---

**Organized by**

# One Day Interdisciplinary National Conference on

# Recent Trends in Social Sciences and Commerce

**Tuesday, 27th February, 2018**

**Principal & Organizer**

Dr. S.R. Nimbore

**Convenors**

Prof. D.P. Mundhe    Dr. S.M. Wandhare    Prof. R.S. Satbhai

**Published By**

**Harshwardhan Publication Pvt. Ltd.**

**Limbaganesh, Dist.Beed**

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 24 | बालकामगार समस्या | प्रा.वाळके बी.बी. | 84 |
| 25 | बालकामगार समस्या आणि उपाय | डॉ. विठ्ठल भिमराव मातकर | 88 |
| 26 | भारतातील बालकामगार समस्या : कारणे व उपाय | प्रा.सिताराम के. मांगल<br>प्रा.भागवत द.गोरे | 92 |
| 27 | बालकामगार समस्या : कारणे आणि उपाय | प्रा. पेरके वैशाली शेषराव | 96 |
| 28 | बालमजूरीचे निर्मूलन एक सामाजिक आव्हान | प्रा.डॉ. रेणुका द. बडवणे | 99 |
| 29 | बालकामगार एक सामाजिक समस्या | प्रा.डो.आव्हाड बी.बी. | 102 |


## History


| | | | |
|---|---|---|---|
| 30 | Role of Womens in Indian Freedom Struggle | Dr Rajaram.R.Pimpalpalle | 105 |
| 31 | A Historiographical Survey: Women's in Indian History | Dr. B.K. Shep | 107 |
| 32 | Mahatma Jotirao Phule: A Philosopher & Maker of Modern Maharashtra | Mahesh S Jadhav | 110 |
| 33 | Dr. B.R. Ambedkar's Indian Constitution Legacy as the Maker of the Modern India | Mr. D. M. Randive | 113 |
| 34 | Netaji Subhashchandr Bose : Great Freedom Fighter | Mr. Sandip Haribhau Shirsath | 115 |
| 35 | Nomadic Tribes in India: a reflection on history of Masan Jogi | Priyanka Jadhav Pradnyasurya Hemchand Shende | 121 |
| 36 | Gandhi's Economic Thought | Prof. Ravi Subhashrao Satbhai | 126 |
| 37 | भारतीय क्रांतिकारी चळवळींमध्ये कल्पना दत्तचे योगदान | प्रा. डॉ. विजया साखरे | 132 |
| 38 | १८५७ च्या राष्ट्रीय उठावात बेगम जिनत महल आणि हजरत महल या मुस्लिम महिलांचे योगदान | डॉ.शेख हुसेन इमाम | 135 |
| 39 | भारतीय इतिहासातील कर्तृत्ववान स्त्रिया | डॉ.शिवाजी सोमला पवार | 138 |
| 40 | आधुनिक भारताच्या निर्मितीत पंडित नेहरूंचे शैक्षणिक योगदान | प्रा. राजेसाहेब भोसले | 142 |
| 41 | छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यापारविषयक धोरण | प्रा. बोडके बालाजी रावसाहेब | 144 |
| 42 | भारतीय स्त्रियांच्या सामाजिक शैक्षणिक स्थितीचा ऐतिहासीक मागोवा | प्रा. डॉ. बिराजदार डी. एस. | 147 |
| 43 | आधुनिक भारताच्या इतिहासातील महिलांचा सहभाग | प्रा.डॉ.शिवाजी लक्ष्मण नागरगोजे | 150 |
| 44 | आधुनिक भारताच्या इतिहासात स्वातंत्र्य चळवळीतील | प्रा. मोहन काळकुट | 1! |
| 45 | स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाचा ऐतिहासिक अभ्यास | प्रा.डॉ.जी.व्ही.गट्टी ड डॉ.<br>राधाकृष्ण ल. जोशी | 155 |
| 46 | समाज सुधारक सावित्रीबाई फुले | प्रा.डॉ.सदाफुले डी.एल. | 157 |
| 47 | भारतातील स्त्रीवादी चळवळीचे स्वरुप | प्रा.घाडगे सोमनाथ व्यंकटी | 161 |


Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 48 | स्त्रीवादी इतिहासलेखन | [illegible] | |
| 49 | स्वातंत्र्य संग्रामातील विरांगणा : राणी चेन्नम्मा | प्रा. सोमनाथ गुंजकर | 166 |
| 50 | आधुनिक भारताचे निर्माते | श्री फोळेकर नितीन बापुराव<br>श्री डोंबाळे भरत सुदाम | 169 |
| 51 | रा. ना. प्रणित विसाव्या शतकातील निधर्मी धर्मविचार | अजित लक्ष्मण भालसिंग | 171 |
| 52 | सावित्रीबाई फुलेंची स्त्री मुक्ति चळवळ | भानवसे कृष्णा अंबादास | 173 |
| 53 | भारतीय इतिहासात कर्तृत्ववान स्त्रियांचे योगदान | कु. रेणुका प्रकाशराव हाक्के | 177 |
| 54 | भक्ति चळवळीतील संत जनाबाईचे योगदान | प्रभाकर नारायण शिंदे | 179 |
| 55 | राजश्री शाहू महाराज यांचे सामाजिक कार्य | शेळके जगदीश भाऊसाहेब | 184 |
| 56 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्रातील दलित चळवळी | राठोड गुलाब तातेराव | 187 |
| 57 | श्रीमती इंदिरा गांधीची कामगिरी | डॉ. पी.बी. सिरसट | 189 |
| 58 | पंडिता रमाबाई : कार्य आणि कर्तृत्त्व | सुर्यवंशी सुमित्रा भगवानराव | 192 |
| 59 | भारतीय इतिहासातील सामाजिक सुधारणेत स्त्रियांचे योगदान | डॉ. सखाराम मारुती वांढरे | 195 |

ISSN - 2319 9318

# रा. ना. प्रणित विसाव्या शतकातील निधर्मी धर्मविचार

अजित लक्ष्मण भालसिंग
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

युरोपातील प्रबोधन चळवळीने व्यक्ती केंद्रीत समाजमूल्ये विकसित केली. प्रबोधनातून परिवर्तन व परिवर्तनातून विकास हेच युरोपातील प्रबोधनाचे सूत्र होते ज्ञान हे परिवर्तनाचे प्रभावी साधन असते. बुद्धीप्रामाण्यवादी समाज विकसित करण्याचे श्रेय हे युरोपातील ज्ञानयुगाला जाते. मानवी समाज हा धर्म, अर्थ, जातीभेद, यासारख्या विविध घटकांमध्ये गुरफटलेला असतो. धर्म हा मानवी जीवनाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष नियंत्रित करत असतो. धर्म समाजव्यवहाराची चाकोरी निर्माण करून देतो. धार्मिक वर्तन हा माणसाच्या सामाजिक वर्तनाचा एक अविभाज्य भाग असतो. भारतात राजा राममोहन रॉय यांनी भारतीय प्रबोधनाचा पाया घातला. प्रबोधन म्हणजे विवेकी व चिंतनशील विचार होय. विचार ही मानवी कृती मागची खरी प्रेरणा असते. राजाराममोहन रॉय यांनी धर्मातील धर्मांच्या जोखडातून मुक्ती मिळवून देण्यासाठी 'ब्राह्मो समाज' या विवेकवादी विचारकेंद्राची स्थापना केली. समाजामध्ये ऐक्य निर्माण करण्यासाठी 'एकेश्वर वादाचा' पुरस्कार केला. ब्राह्मो समाजाने समाजातील अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा या अवस्था व समताधिष्ठित समाज निर्माण करणे हे ध्येय ठेवले. नव्या काळात कालानुरूप प्रबोधन निकडीचे ठरते व स्थल व कालपरत्वे परिवर्तनाचे स्वरूपही बदलते. समाजामध्ये निरंतर परिवर्तनशीलता हा समाजाचा स्थायीभाव असतो. परिवर्तनशील समाज हा प्रवाही रहातो. विकसित होतो त्याचप्रमाणे तटस्थ चिकित्सेतून आपला एक विवेकी व चिंतनशील विचारप्रवाह विकसित करतो.

आज आधुनिकता ही वस्तुस्थितीत भिन्न असते. स्थल व कालपरत्वे तिचे स्वरूप बदलत असते. आधुनिकता मुख्यत: आपल्या मूल्यरचनेशी निगडीत असते. आधुनिकता ही निव्वळ कालवाचक संज्ञा नसून ती मनुष्याने मूल्यवाचक संज्ञा आहे. सामाजिक मूल्ये विकसित करणारा व व्यक्तीस्वातंत्र्याला, बुद्धीप्रामाण्यवादाला, समतेला, न्यायाला प्रेरणा देणारा कोणताही काळ हा आधुनिक ठरतो. महात्मा गौतम बुद्धाचा समता विचार हे महात्मा फुलेंच्या समताविचारांशी वैचारिक साम्य दर्शविणारा आहे. दोघेही मूल्यात्मक पातळीवर आधुनिक काळाचे निर्माते ठरतात व मानवी जीवनाला समताधिष्ठित समाजरचनेचा मूलमंत्र देतात. आज कालानुरूप 'धर्म' या संकल्पनेचा अर्थ, स्वरूप, यामध्ये परिवर्तनशीलता दिसून येते. समाजातील विभिन्न घटकांच्या धर्मविषयक धारणा भिन्न असतात व धर्माकडून असलेल्या गरजांचे स्वरूप ही भिन्न असते. समाजातील विशेषाधिकार प्राप्त वर्गाला धर्माकडून विशेषाधिकार राखण्याची अधिमान्यता हवी असते तर कनिष्ठ वर्गाला धर्मकेंद्रीत जीवन हाच मुक्तीमार्ग वाटतो हा स्थितीशीलतेचे विचार आहे. आधुनिक कष्टकरी कामकरी वर्गाला धर्मापेक्षा विचारप्रणालीचे अधिक आकर्षण असल्याचे दिसते कारण ते विचारातून नवपरिवर्तनाची नवसंकल्पनेची बीजे शोधत असतात. रा.ना. चव्हाण हे आधुनिक महाराष्ट्रात स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात परिवर्तनवादी चळवळींची धुरा वाहताना दिसतात. रा.ना. समन्वयवादी विचारातून क्लिष्ट स्वरूपाच्या धर्मविषयक विचाराची समीक्षा करतात व हे करत असताना ते सत्य म्हणजे धर्म या मूल्यांशी एकरूप होताना दिसतात व विवेकवादी धर्म या विचाराची, स्वरूपाची, कालानुरूप परिवर्तनाचा नवविचार समाजाला देण्याचा व समाज एकरूप करण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

रा.ना. आपल्या धर्मविचारात म्हणतात मी ब्राह्मधर्मीय आहे आणि हा धर्म सत्यविचारावर आधारलेला आहे. त्याने मूर्तीपूजा, अवतारवाद या समाजातील अनिष्ट मूल्यावरती घाव घालण्याचे काम केले. धर्मविचारामध्ये चिकित्सेच्या युगाचा प्रारंभ केला. समन्वय, समभाव व ऐक्य यातून ब्रह्मधर्मीय विचार प्रवाहीत होत असतो. रा.ना. म्हणतात कोणताही परिवर्तनशील, चिरस्थायी, हितप्रद व समाजहितैषी असणाऱ्या गोष्टी या सधर्मात मिळत असतात. धर्मस्वातंत्र्याशिवाय व्यक्तीस्वातंत्र्याला मर्यादा पडतात. कारण समाज हा धर्मनियंत्रित असतो व व्यक्ती हा समाजनियंत्रित असतो म्हणून रा.ना. धर्म अनुसरण्यामध्ये बुद्धीप्रामाण्यवादी व चिकित्सक धर्मविचार देणाऱ्या ब्राह्मसमाजाला बळकटी देतात. परिवर्तनासाठी होणाऱ्या वैचारिक चळवळींचे ध्येय हे विधायक असायला हवे. 'धर्म' ही नियंत्रण केंद्रे न राहता ते विचार केंद्रे बनण्याची गरज रा.ना. प्रतिपादन करताना दिसतात.

धर्मातील सुधारणा म्हणजे काय तर, मध्यस्थांविना संवाद होय. आत्मा व परमात्मा यांचे एकत्व म्हणजे संवाद होय. धर्माने सत्य विचारांचा अंगिकार केला पाहिजे. तसेच इतरधर्मातील समताधिष्ठित मूल्यविचाराचा सत्यशोधन व सत्यग्रहण या न्यायाने त्याचा अंगिकार करून त्याचा स्विकार करावा रा.ना. म्हणतात कोणताही धर्म हा विवेकी ठरतो जेव्हा तो आपल्या अनुयायाना धर्मस्वातंत्र्य, उदारता, सहिष्णुता, आत्मपरीक्षण, आत्मोन्नती, इत्यादींचा विकास करण्याची संधी देतो. ब्राह्मधर्म हा हिंदूधर्माची कालसापेक्ष पुनर्मांडणी होय ते म्हणतात 'धर्म' ही एक आचरणपद्धती आहे व ती कालसुसंगत असेल तरच ती कालबाह्य होत नाही म्हणून ती

काळानुरूप परिवर्तनीय, असावी म्हणजे ती तत्त्वे कालबाह्य होत नाहीत. ब्राह्मधर्मीयाचे विविध धर्मातील सत्य अशा तत्त्वांचा संचय करणे हे काम आहे व ते काम प्रत्येक युगांत कालखंडात तसेच अविरतपणे चालू राहील. कारण चिंतनशील, परिवर्तनीय विचार हा ब्राह्मधर्मीय विचारांचा आत्मा आहे.

रा.ना. ईश्वराचे किंवा निर्मिकांचे स्थान विशद करताना सांगतात प्रत्येक वस्तू ही ब्रह्मस्वरूप आहे व प्रत्येक घटकांमधील मानवाला उपयुक्त असणाऱ्या घटकांचा अंगिकार करणे म्हणजे 'उपासना' होय. अशी विवेकनिष्ठ, बुद्धीप्रामाण्यवादी व्याख्या उपासनेची करतात तसेच भक्तीच्या स्वरूपाविषयी ते म्हणतात संशोधन व शुद्धी यातून अभिव्यक्त होत असते. समन्वयात्मक विचारातून चिंतनशील धर्मविचार वृद्धींगत होत असतो. रा.ना. विचारानुसार संतांनी समताविचारातून, आचरणातून, साहित्यातून धर्म हा सार्वजनिक केला व धर्माची सर्वसमावेशकता वाढविण्यासाठी नाममार्ग किंवा नामस्मरण हे चिंतनाचे माध्यम म्हणून समाजाला निर्माण करून दिले. ईश्वर हा सत्यम् व ज्ञानम् आहे म्हणून भक्ती व ज्ञान यांचा विरोध असू नये उलट समन्वय असावा यातून चिकित्सक श्रद्धेचा जन्म होतो.

आज कोणत्याही क्षेत्रातील अतिरेकी विचार व कार्यपद्धती मानवी समुहांची प्रगती करू शकत नाही तर उदारता, सहिष्णुता समन्वय, परस्पर सहकार्य, जागतिक दृष्टी, व सर्व मानवातील आपआपसातील प्रेमभाव ही विश्वधर्माची आचारसूत्रे आहेत. धर्मसंप्रदायाचा उगम सांगताना ते म्हणतात. कालसापेक्ष थोरपुरूष हे लोकल्याणार्थ झटतात व समाजाला कल्याणाचा किंवा परिवर्तनाचा मार्ग दाखवतात पण जर त्यांचे अनुयायी थोर पुरूषांची शास्त्रवचने धर्ममत म्हणून स्वीकारू लागले तर त्यातून आपआपला विशिष्ट संप्रदाय रूढ होतो. संप्रदायाच्या विकासातून विवेकवादाचा चिंतनशील विचार नष्ट होतो. धर्म हा व्यक्तीच्या कुटुंबाच्या, समाजाच्या, राष्ट्रांच्या व अखिल जगाच्या प्रगतीस साह्यभूत होणार आहे. म्हणून 'धर्मा विस्मृश्य जगतः प्रतिष्ठा' या शब्दात रा.ना. त्याचे स्थान अधोरेखित करतात. रा.ना. ऐतिहासिक घटीतामधून मानवाने बोध घेऊन परिवर्तन केले पाहिजे नाही तर गतेतिहासाचा काहीही उपयोग नाही असे ते म्हणतात. ईश्वरभक्तीतील व ईश्वर उपासनेतील अभंगाचे स्थान सांगताना ते म्हणतात विसाव्यातील तुकाराम महाराजांची 'अभंगगाथा' हे आधुनिक काळातील भक्तीचे उपनिषदच आहे. व ते समाजजीवनाच्या भाव भावनाचे चिंतनशील मार्गदर्शक साहित्य बनले.

मानवाने केलेल्या तौलनीक धर्म अध्ययनामुळे व साधनेतून मानवविचार उत्कट होण्यास प्रेरणा मिळते व इतर धर्मातील संताविषयी प्रेमभाव वाढतो. भेदाभेद नष्ट होतो व यातून विश्वधर्माचे दर्शन घडते. विवेकवादी व्यक्ती ही संघर्षातून, त्यागातून साधनेतून, संतपदाला जाते हेच सर्वधर्मातील संताचे एकत्व अधोरेखित करते. त्यागातूनच श्रेष्ठत्व हा समानधागा होय. विवेकवादाला धाडस व क्रियाशक्तीची जोड मिळाली तर समाज हा अनिष्ट, चालीरिती, परंपरा यांच्या जोखडातून मुक्त होतो भक्ति विरहित ज्ञान व विवेक फोल आहे. विवेक व श्रद्धेतून धर्माचा भक्तीमार्ग वृद्धींगत होतो.

धर्मांच्या जन्मप्राप्त जाती झाल्या आहेत व वेगवेगळे धर्म म्हणजे वेगवेगळ्या जन्मजातीच होय. ही जातीय भिन्नता राष्ट्रहितकारक नाही. कोणीही कोणाच्या धर्मावर अतिक्रमण न करता प्रथम आपण भारतीय आहोत. 'राष्ट्रीयता' हा समान धर्म आहे. समान संस्कृती हे अनमोल ठेवा आहे. अशी देशाभिमानी व लोकशाहीवादी भारतीय या विचारांशी एकमय धर्मदृष्टी सर्व भारतीयांमध्ये विकसित होणे देश व समाजहिताचे आहे. रा.ना. नी आपल्या धर्मचितनामध्ये विवेकवाद, सत्यनिष्ठा, परिवर्तन, एकत्व, समताविचार यासारख्या नितीमूल्यांचा समावेश केला आहे. की जे विचार विसाव्या शतकातील विवेकवादी धर्मविचाराला प्रेरणा देतो. ब्राह्मधर्मीय विचार हा सत्यसंचय करणारा प्रवाही धर्मविचार आहे. म्हणून तो प्रत्येक कालखंडात नव्या रूपात अभिव्यक्त होतो.

**संदर्भ ग्रंथ :**


१) चव्हाण, रा.ना., वैशाली चव्हाण (संपा.), "सेवित्रे हा रस। वाटितो आणि कां ।।, भाग १, २, ३, १९९५, १९९६, १९९७.

२) चव्हाण, रा.ना., वैशाली चव्हाण (संपा.), "जनजागरण" १९९८.

३) चव्हाण, रा.ना., वैशाली चव्हाण (संपा.), "प्रबोधन" २०००.

४) चव्हाण, रा.ना., रमेश चव्हाण (संपा.), "भारतीय संस्कृती व तिची वाटचाल" २०१२.

५) पाटील प्रकाश, "समाजप्रबोधनाची आव्हाने" १९९२.

६) पंडीत, नलिनी, "महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास", १९७२.

७) चव्हाण, रा.ना., मो.नि. ठोके, (संपा.), "रा.ना. चव्हाण : निवडक वाङ्मय", १९८६.

८) भोळे भा.ल., "समाजविमर्श", डिसेंबर २०१०

9) कुरणे सुनील कुमार, "रा.ना. चव्हाण सामाजिक व राजकीय विचार", २०१६.

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

# Arts, Commerce and Science College, Ashti

Tal. Ashti, Dist. Beed (MS)

**Accredited by NAAC B++ Grade with 2.78 CGPA, ISO 9001 : 2015 Certified, Green Audited College**

## ONE DAY INTERDISCIPLINARY NATIONAL CONFERENCE ON RECENT TRENDS IN SOCIAL SCIENCES AND COMMERCE

# CERTIFICATE

*This is to certify that Prof./Dr./Mr./Mrs.* अजित लक्ष्मण मालसिंग *of* सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे *has Participated / Worked as Resource Person / Submitted a Paper on* रा. ना. प्रणित विसाव्या शतकातील निधर्मी धर्मविचार *in the National Interdisciplinary Conference on "Recent Trends in Social Sciences and Commerce" on 27th February 2018.*

Convener

Dr. S. R. Nimbore
(Principal / Organizer)